
REDMI NOTE 8
AI QUAD CAMERA











राजगड टेक्निकलमधील विद्यार्थ्यांचे गुलाब देऊन स्वागत करताना.

# राजगड टेक्निकलमध्ये गुलाबाने स्वागत

**सारोळा :** कोरोनो महामारीमुळे दीड वर्ष शिक्षण क्षेत्राला लागलेले टाळे कोरोनाचे सर्व नियम पाळून उघडण्यात आले. या वेळी आलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प देऊन त्यांचे मनोबल वाढवण्याचा एक आगळा-वेगळा उपक्रम राजगड ज्ञानपीठ टेक्निकल संस्थेमार्फत करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री अनंतराव थोपटे, संस्थेचे कार्याध्यक्ष व भोरचे आमदार संग्राम थोपटे, संस्थेच्या मानद सचिव डॉ. भाग्यश्री पाटील यांनी कोरोना प्रतिबंधात्मक सर्व उपाययोजना करून विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व संबंधित सर्व कर्मचारी यांनीदेखील सर्व खबरदारी घेत कामकाजास सुरुवात करावी, अशा मार्गदर्शक सूचना दिल्या. याप्रसंगी डीग्रीचे प्राचार्य डॉ. पाटील, डिप्लोमाचे प्राचार्य प्रो. खोपडे, इस्टेट मॅनेजर राहुल खामकर, कार्यालयीन अधीक्षक गोरख जगताप, इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

दै.पुढारी ...वैभव धाडवेपाटील